MAHARASHTRA KNOWLEDGE CORPORATION LIMITED

MKCL
Creating a Knowledge Lit World
www.mkcl.org

दिनांक: १७ ऑक्टोबर २०१६

संदर्भ क्रमांक: एमकेसीएल:२०१६/Renewal/०२

**विषय : 'वर्ष २०१७ साठी MS-CIT केंद्र नूतनीकरण प्रक्रिया'**

**प्रिय MS-CIT केंद्र समन्वयक,**

**सप्रेम नमस्कार,**

वर्ष २०१६ मध्ये MS-CIT च्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या २ बॅचेस प्रवेशासाठी अद्याप शिल्लक आहेत. आपल्यापैकी बहुतांशी केंद्रांनी यावर्षीच्या विपरीत परिस्थितीतही चांगली कामगिरी केली आहे. त्यांचे मनापासून कौतुक. पण आपल्यापैकी काही केंद्रांचा व्यवसाय अजूनही गेल्या वर्षाइतका झालेला नाही. याकरिता अथक प्रयत्न करावे लागणार आहेत. 'शिक्षकदिन समारंभ', 'स्पर्धा परीक्षा Genius', 'महा IT Genius स्पर्धा', 'SSC प्रक्टिस टेस्ट', 'महाजागृती अभियान', MKCL तर्फे 'घरपोहोच फ्लायर अभियान' तसेच इतर स्थानिक मार्केटिंग उपक्रमांचा ऊपयोग करून जास्तीत जास्त प्रवेश नोंदवून तुम्ही सर्वजण उत्कृष्ट कामगिरी कराल याची मला खात्री आहे.

वर्ष २०१७ मध्ये प्रवेश करत असताना MS-CIT केंद्र नूतनीकरणासंबंधी महत्वाच्या बाबी जानेवारी २०१७ ची बॅच सुरु होण्याआधी ३ महिने तुम्हाला कळवण्यासाठी हे सविस्तर पत्र लिहीत आहे. पत्र प्रदीर्घ असले तरी महत्वाचे असल्याने आपण वेळात वेळ काढून ते पूर्ण वाचावे व काळजीपूर्वक वाचावे ही विनंती.

## १. केंद्र नूतनीकरणासाठी किमान प्रवेशांचा निकष:

| कोर्स | बॅच | शहरी/ निमशहरी भागातील ALCsसाठी किमान प्रवेश | ग्रामीण भागातील ALCsसाठी किमान प्रवेश |
|---|---|---|---|
| MS-CIT | जानेवारी २०१६ ते नोव्हेंबर २०१६ | १०० * | ५० * |

१.१. *शैक्षणिक संस्थाना (शाळा व कॉलेजेस) या नियमातून वगळण्यात आलेले आहे.

१.२. जी केंद्रे किमान प्रवेशांचा निकष पूर्ण करतील अशाच केंद्राच्या solar login मध्ये MS-CIT केंद्र नूतनीकरणाची लिंक दिनांक २२ ऑक्टोबर २०१६ पासून उपलब्ध होईल.

१.३. जी केंद्रे निकष पूर्ण करणार नाहीत त्यांच्यासाठीच्या सूचना खाली दिल्या आहेत.

## २. शुल्क (फी):

२.१ वर्ष २०१६ मध्ये जी MS-CIT केंद्रे प्रवेशाचा वरील निकष पूर्ण करू शकणार नाहीत अशा केंद्रांना २०१७ च्या केंद्र नूतनीकरणाच्या प्रक्रियेमध्ये गेल्या वर्षी दिलेली 'स्लॅबवाइज सेक्युरीटी डिपॉझीट' भरून नूतनीकरण करण्याची सुविधा उपलब्ध होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मात्र खालील विशेष सुविधा काही निकष पूर्ण करणाऱ्या केंद्रांना उपलब्ध करून देण्यात येईल:

| पर्याय क्र. | ALC चा Area Type | जानेवारी २०१६ ते नोव्हेंबर २०१६ बॅचमधील MS-CIT प्रवेश संख्या | भरावे लागणारे सेक्युरीटी डिपॉझीट |
|---|---|---|---|
| १ | शहरी/निमशहरी | ० ते ५९ | सेक्युरीटी डिपॉझीटचा पर्याय उपलब्ध नाही (नूतनीकरण होऊ शकणार नाही) |
| २ | शहरी/निमशहरी | ६० ते ९९ | रु. १,२२,६००/- |
| ३ | ग्रामीण | ० ते २९ | सेक्युरीटी डिपॉझीटचा पर्याय उपलब्ध नाही (नूतनीकरण होऊ शकणार नाही) |
| ४ | ग्रामीण | ३० ते ४९ | रु. ६१,३००/- |

२.१.१. जी केंद्रे वर दर्शविल्याप्रमाणे किमान प्रवेशांचा निकष पूर्ण करतील अशाच केंद्राच्या solar login मध्ये MS-CIT केंद्र सशर्त नूतनीकरणाची लिंक २५ नोव्हेंबर २०१६ पासून उपलब्ध होईल.

२.१.२. वर दर्शविल्याप्रमाणे सेक्युरीटी डिपॉझीट केंद्राने विहित मुदतीत भरले तरच त्यांचे नूतनीकरण होईल.

२.१.३. सेक्युरीटी डिपॉझीट MS-CIT / KLiC / Mastering कोर्सेसच्या प्रवेशासाठी (MFO) म्हणून वर्ष २०१७ मध्ये वापरता येईल.

२.१.४. ज्या MS-CIT केंद्रांचे वर्ष २०१७ साठी नूतनीकरण होणार नाही अशा केंद्रांना वर्ष २०१७ मध्ये KLiC कोर्सेस सुद्धा चालविता येणार नाहीत. तसेच अशा केंद्रांना वर्ष २०१७ साठी Exclusive KLiC केंद्राची सुद्धा मान्यता मिळणार नाही.

२.१.५. ज्या MS-CIT केंद्रांचे वर्ष २०१७ साठी नूतनीकरण होणार नाही अशा केंद्राच्या जवळ अथवा त्या केंद्राच्या जागेवर नवीन केंद्र देण्याची प्रक्रिया डिसेंबर २०१६ मध्ये राबविण्यात येईल. अशा ठिकाणी ज्या संस्थांनी MS-CIT वर्ष २०१७ साठी अगोदरच अर्ज केलेले आहेत अशा संस्थांचा विचार करण्यात येईल.

२.१.६. जी MS-CIT केंद्रे वर्ष २०१७ साठी नूतनीकरणस पात्र आहेत परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे त्यांना नूतनीकरण करणे शक्य नाही अशा केंद्रांचे मालक MKCLकडे २५ नोव्हेंबर २०१६ पर्यंत लेखी अर्ज करून व MKCL च्या लेखी स्वरूपातील पूर्व परवानगीनंतर आपले केंद्र दुसऱ्या संस्थेला हस्तांतरित करू शकतात.

**२.२ MS-CIT केंद्र नूतनीकरणाचे निकष पूर्ण करणाऱ्या केंद्रांसाठी खालील दोन पर्याय आहेत:**

**पर्याय १] MS-CIT केंद्र नूतनीकरण वर्ष २०१७ या एकाच वर्षाकरीता:**

| **शीर्षक** | **शुल्क (रुपयांमध्ये)** |
|---|---|
| नूतनीकरण शुल्क | ५,०००/- |
| प्रक्रिया शुल्क | ५००/- |

**पर्याय २] पाच वर्षांकरिता MS-CIT केंद्र नूतनीकरणाची सशर्त हमी (१ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०२१):**

| **शहरी/निमशहरी भागातील ALCsसाठी प्रतिवर्षी अंदाजे नोव्हेंबर महिन्यात भरवयाचे वार्षिक सेक्युरीटी डिपॉझीट** | **ग्रामीण भागातील ALCsसाठी प्रतिवर्षी अंदाजे नोव्हेंबर महिन्यात भरवयाचे वार्षिक सेक्युरीटी डिपॉझीट** |
|---|---|
| 100* MS-CIT MFO | 50* MS-CIT MFO |

**टीप:**

प्रतिवर्षी अंदाजे नोव्हेंबर महिन्यात वर दर्शविल्याप्रमाणे सेक्युरीटी डिपॉझीट केंद्राने विहित मुदतीत भरले तरच त्यांचे त्या त्या वर्षासाठी नूतनीकरण होईल.

२.२.१. पाच वर्षांपैकी कुठल्याही वर्षासाठी सेक्युरीटी डिपॉझीट भरण्यास विलंब झाला अथवा ते भरले नाही तर केंद्राची मान्यता आपोआप रद्द होईल व पाच वर्षातील उर्वरित कालावधी साठी केंद्र चालवता येणार नाही.

२.२.२. वर्ष २०१७ साठी MFO रुपये १२२६ असल्याने यावर्षी खालील दराने वार्षिक सेक्युरीटी डिपॉझीट भरावे लागेल.

| शहरी/निमशहरी भागातील ALCsसाठी सेक्युरीटी डिपॉझीट | ग्रामीण भागातील ALCsसाठी सेक्युरीटी डिपॉझीट (शुल्क रुपयामध्ये) |
|---|---|
| १,२२,६०० | ६१,३०० |
| तसेच MS-CIT केंद्र नूतनीकरण २०१७ वर्षाकरीता शुल्क: | |
| नूतनीकरण शुल्क | ५,०००/- |
| प्रक्रिया शुल्क | ५००/- |

२.२.३. एखाद्या वर्षी प्रवेशसंख्येच्या निकषाची पूर्तता न झाल्यासही या सेक्युरीटी डिपॉझीट पर्यायाचा अवलंब करून ALCs ना त्यांचे केंद्र १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०२१या पाच वर्षातील उर्वरित कालावधीसाठी प्रतिवर्षी ठराविक डिपॉझीट भरून चालू ठेवता येईल.

२.२.४. या पर्यायाद्वारे केंद्रांना पुढील पाच वर्षे सुरक्षित आर्थिक गुंतवणूक करून व मनुष्यबळाची तरतूद करून नियोजनबद्ध व्यवसाय करण्याची संधी मिळेल.

२.२.५. सेक्युरीटी डिपॉझीट MS-CIT / KLiC / Mastering कोर्सेसच्या प्रवेशासाठी (MFO) म्हणून वर्ष २०१७ मध्ये वापरता येईल.

२.२.६. तसेच दरवर्षी सेक्युरीटी डिपॉझीट हे शहरी/निमशहरी भागासाठी १०० व ग्रामीण भागासाठी ५० प्रवेशांचा MS-CIT MFO इतका भरावा लागेल.

२.३ वर्ष २०१७ साठी केंद्र नूतनीकरण करतांना केंद्रास TP बदल करणे अगदी अनिवार्य असल्यास त्यांना त्यांच्या solar login मधून तशी सकारण विनंती करता येईल व सध्याच्या TP बरोबर चर्चा केल्यानंतरही त्यांचा निश्चय कायम राहिल्यास त्यांना त्यांच्या पसंतीचा TP निवडता येईल.

२.४ वर्ष २०१७साठी कॉमन मार्केटिंग फंड (CMF) असणार नाही.

२.५ वर्ष २०१७ साठी सर्व नूतनीकरण झालेल्या केंद्रांसाठी MKCL eStoreची सुविधा कार्यान्वित करण्यात येईल. CMF ऐवजी MKCL तर्फे केंद्राकरिता स्थानिक पातळीवरील वैयक्तिक मार्केटिंगसाठी उपयुक्त असणारी उत्पादने केंद्रांच्या मागणीनुसार वाजवी दरामध्ये ऑनलाईन उपलब्ध करून देणार आहोत. MKCL eStore च्या संकेतस्थळावर MKCL कोर्सेसशी संबंधित लीफलेट, फ्लायर्स, ब्रोशर्स, डँगलर्स, पोस्टर्स, कौन्सेलिंग फ्लिपचार्टस, इ. अनेक गोष्टी केंद्राच्या वार्षिक आगाऊ ऑर्डरनुसार उपलब्ध करून देणार आहोत. या सुविधेची सविस्तर माहिती लवकरच आपल्याला कळविली जाईल.

## ३. OnCeT:

MS-CIT केंद्र नूतनीकरण प्रक्रिया २०१७ साठी केंद्रसमन्वयक, शिक्षण सुलभक (Learning Facilitator) व समुपदेशक यांनी खालील Online Certification Test (OnCeT) परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

- OnCeT for Center Coordinator (केंद्र समन्वयक)
- OnCeT for Learning Facilitator (शिक्षण सुलभक)
- OnCeT for Counselor (समुपदेशक)

३.१. प्रतीव्यक्ती/प्रतीपरीक्षा OnCeT शुल्क हे रु. १००/- इतके आहे.

३.२. वर्ष २०१७ करिता MS-CIT कोर्सचा अभ्यासक्रम हा Windows 7 आणि MS Office 2013 वर आधारित असेल.

३.३. केंद्रचालक (Center Coordinator), शिक्षण सुलभक (Learning Facilitator) व समुपदेशक (Counselor) यांना त्यांच्या आधार कार्डाचे तपशील solar वर भरणे आवश्यक राहील.

## ४. केंद्राच्या सेट-अपबद्दलचे नियम:

**खालील गोष्टींसाठी केंद्रात स्वतंत्र जागा असणे आवश्यक आहे.**

४.१. **समुपदेशन कक्ष** (Counseling Area)

४.२. **वर्गखोली** (क्लासरूम): प्रती १० विद्यार्थ्यांसाठी किमान १०० स्क्वेअर फूट जागा आवश्यक

४.३. वर्गखोलीत शुध्द व खेळत्या हवेचा स्रोत असावा व बाहेरील गोंगाटाचा उपद्रव न होण्याची काळजी घ्यावी.

४.४. वर्गखोली (क्लासरूम)मध्ये खालील गोष्टी असणे बंधनकारक आहे.

४.४.१. शिक्षण सुलभकासाठी (Learning Facilitator साठी) १ टेबल, १ खुर्ची, केंद्राच्या ERA Server ला LAN/Wireless LAN ने जोडलेला एक Laptop/Desktop व त्याला जोडलेली उत्कृष्ट गुणवत्तेची खालील उपकरणे: Camera, Speaker, Mike व Projector

४.४.२. वर्गखोलीच्या भिंतीवर योग्य उंचीवर लावलेला, योग्य आकाराचा व उत्कृष्ट गुणवत्तेचा Projection Screen असणे आवश्यक

४.४.३. १० विद्यार्थ्यांसाठी १० खुर्च्या (ERA तील प्रोजेक्ट केलेला शैक्षणिक आशय बघण्यासाठी सर्व खुर्च्या स्क्रीनकडे वळवता याव्यात व गटचर्चा/गटउपक्रमांच्या वेळी वर्तुळाकार मांडता याव्यात)

४.५. **संगणक प्रयोगशाळा** (कम्प्यूटर लॅब): प्रत्येक विद्यार्थ्याने १ संगणक स्वतंत्ररीत्या वापरण्यासाठी प्रती १० विद्यार्थ्यांसाठी किमान १०० स्क़्वेअर फूट जागा आवश्यक

४.६. संगणक प्रयोगशाळेत eProcessfolio च्या पूर्वतयारीसाठी आरसा

४.७. **इतर सुविधा:** केंद्राचा नामफलक, केंद्राकडे जाण्याचा रस्ता दर्शवणारे दिशादर्शक फलक, सायकल स्टँड, स्वच्छ स्वच्छता गृह, पिण्याचे शुध्द पाणी, चप्पल स्टँड, नोटीस बोर्ड, केंद्र समन्वयक व इतर स्टाफचे नावांसह फोटो असलेला तसेच चालू बॅचेसमधील विद्यार्थ्यांचे परीक्षेसाठी ग्राह्य असे फोटो असलेला डिस्प्ले बोर्ड, इ.

४.८. MS-CIT कोर्सचा सेशनवाईज सविस्तर अभ्यासक्रम, फी, प्रवेश प्रक्रिया, क्लासरूम व लॅबमधील शिक्षण प्रक्रिया, अंतर्गत मूल्यमापन, अंतिम online परीक्षा इ. संबंधीचे २०१७ साठीचे तपशील ALCच्या विचारार्थ या महिनाअखेर पर्यंत पाठवण्यात येतील व साधारणतः १५ नोव्हेंबर २०१७ पूर्वी त्यांना अंतिम स्वरूप देण्यात येईल.

## ५. आय.टी. इन्फ्रास्ट्रक्चरचे नियम:

५.१. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शक्यतो प्रत्येक केंद्र हे परीक्षा केंद्र व्हावे व प्रत्येक बॅचची अंतिम परीक्षा एकच दिवसात संपवता यावी यादृष्टीने व इतर काही तांत्रिक कारणास्तव वर्ष २०१७ पासून Xtenda सेटअप वापरता येणार नाही याची नोंद घ्यावी.

५.२. संगणक/लॅपटॉपची किमान आवश्यक संख्या:

| **कोर्स** | **शहरी/निमशहरी भागातील ALCsसाठी किमान आवश्यक संगणक/लॅपटॉप संख्या** | **ग्रामीण भागातील ALCsसाठी किमान आवश्यक संगणक/लॅपटॉप संख्या** |
|---|---|---|
| MS-CIT | १server + १० clients | १ server + ५# clients |

५.३. # ग्रामीण भागातील केंद्रांची MSBTE कडून MS-CIT चे परीक्षा केंद्र म्हणून निवड होण्यासाठी अजून ५ अतिरिक्त संगणक/लॅपटॉपची पूर्तता परीक्षेच्या दिवशी करणे बंधनकारक असेल.

५.४. प्रत्येक Client Machine साठी २ वेबकॅमेऱ्यांचा (Web Camera) setup लावणे बंधनकारक असणार आहे. एक वेबकॅमेरा हा विद्यार्थ्याच्या चेहऱ्याचा समोरील view चित्रित करण्यासाठी त्याच्या समोर लावला पाहिजे व दुसरा वेबकॅमेरा हा विद्यार्थ्यांच्या हातांचा व कीबोर्ड-माऊसचा view चित्रित करण्यासाठी विद्यार्थ्याच्या डोक्यावर लावला पाहिजे. ह्या २ वेबकॅमेराच्या मदतीने MS-CITची अंतिम online परीक्षा घेण्यात येणार आहे.

५.५. प्रत्येक केंद्राला ५ वेबकॅमेरे पूर्वीच MKCLतर्फे मोफत देण्यात आले आहेत. अजून ५ वेबकॅमेरे डिसेंबर २०१६ अखेरपर्यंत मोफत देण्यात येतील. उर्वरित वेबकॅमेरे केंद्राने स्वतःच्या खर्चाने घ्यावयाचे आहेत.

५.६. प्रत्येक केंद्राला बायोमेट्रिक उपकरण (Biometric Device) लावणे बंधनकारक असणार आहे. Biometric Deviceच्या मदतीने प्रत्येक विद्यार्थ्याला रोजची उपस्थीती नोंदवयाची आहे. प्रत्येक केंद्राला १ Biometric Device पूर्वीच MKCLतर्फे मोफत देण्यात आला आहे. तो नादुरुस्त झाला असल्यास केंद्राने स्वखर्चाने नवा Device घेणे अपेक्षित आहे.

५.७. वर्ष २०१७ साठी Server व Client Machines च्या Configuration मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पण जर तुम्ही तुमच्या केंद्राचे आय.टी. इन्फ्रास्ट्रक्चर अपडेट करू इच्छित असाल तर खालील प्रमाणे बदल करावा:

- **Minimum Server Configuration:** Dual Core Processor (2.4 Ghz) with 8 GB RAM, 500GB Hard disk, Integrated Graphics, 10/100 Mbps Ethernet Card
- **Minimum Client Configuration:**Dual Core Processor 1.6 GHz Processor, 4GB RAM, 160GB Hard disk, 10/100 BaseT PCI Ethernet

५.८. वर्ष २०१८ करिता वरील आय.टी. इन्फ्रास्ट्रक्चर बंधनकारक असणार आहे. त्यामुळे जर आपण आपल्या केंद्रातील आय.टी. इन्फ्रास्ट्रक्चर यावर्षीच अपडेट करणार असाल तर आत्ताच वरीलप्रमाणे बदल करावा.

५.९. केंद्रांना Worm Software मधून त्यांच्या लॅब मधील Server व Client Machines जाहीर करावी लागतील. जी Server व Client Machines Worm Software मधून approve होतील त्यामधूनच विद्यार्थ्यांना ERA प्रणालीचा वापर करता येईल.

येणाऱ्या स्पर्धात्मक काळात विद्यार्थ्यांप्रती समर्पित राहण्यासाठी, उत्कृष्टता आणि गुणवत्तेची कास धरण्यासाठी, आपल्या व्यावसायिक प्रगतीसाठी तसेच आपल्या केंद्रातील ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१६ च्या MS-CIT व KLiC प्रवेशांसाठी मनापासून शुभेच्छा देवून हे विशेष पत्र संपवितो.

आपला स्नेहांकित,

**विवेक सावंत**
**व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित**